**ठळक बातम्या**

- राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणाने प्रारंभ

- अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहात सादर

- राज्यात गुन्हेगारी, बेरोजगारी असे अनेक प्रश्न असून सरकार केवळ घोषणाबाजीच करत आहे, अशी काँग्रेसची टीका

**आणि**

- जागतिक वन्यजीव संरक्षण दिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम/ प्रधानमंत्र्यांची गीर राष्ट्रीय उद्यानाला भेट

**<><><><><><>**

राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणाने आजपासून मुंबईत प्रारंभ झाला. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य सरकार कार्यरत असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी अभिभाषणात केलं. यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला.

देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनात राज्याचं १४ टक्क्यांपेक्षा अधिक योगदान असून थेट परकीय गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला पहिली पसंती आहे, असं ते म्हणाले. दावोसमध्ये झालेल्या १५ लाख कोटी

रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या सामंजस्य कराराचा उल्लेख करुन ते म्हणाले की यातून १५ लाख रोजगारनिर्मिती शक्य आहे. उद्योगांना चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी ५ हजार कोटी रुपयांचे अनुदान वितरीत करण्याची राज्य सरकारची योजना आहे. उद्योगांसाठी साडे ३ हजार एकर औद्योगिक भूखंड वितरीत करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे असं त्यांनी सांगितलं. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल राज्यपालांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे आभार मानले. राज्य सरकार या अंतर्गत उत्कृष्टता केंद्र आणि अनुवाद प्रबोधिनी स्थापन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न सोडवण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांबद्दल ते म्हणाले…

## **होल्ड - बाइट राज्यपाल**

*राज्यपाल बाइट*

*यासाठी सरकारनं तज्ञ वकीलांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयात केली आहे. सीमा भागात राहणाऱ्या मराठी भाषिक नागरिकांच्या भल्यासाठी राज्य सरकार शैक्षणिक, वैद्यकीय तसंच इतर लोककल्याणकारी योजना राबवत आहे.*

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत १ लाख ३२ हजारापेक्षा अधिक युवकांनी प्रशिक्षण घेतले आहे. चालू आर्थिक वर्षात १० लाख युवकांना प्रशिक्षण देण्याचं ध्येय आहे. पंडीत दीनदयाळ रोजगार मेळाव्यातून १९ हजारापेक्षा जास्त उमेदवारांना नोकऱ्या मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

शक्तीपीठ महामार्गामुळे प्रवासाचा वेळ वाचण्यासोबतच आर्थिक विकासाला गती मिळेल. हा महामार्ग बांधताना सर्वांना विश्वासात घेऊ असं राज्यपाल

म्हणाले. राज्यात सुमारे साडे ७ हजार किलोमीटर लांबीचे सिमेंट काँक्रीटचे रस्ते बांधले जात असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्य सरकारनं १ एप्रिलपासून ३ वर्षांसाठी नवं महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय पीएम ई बस सेवा योजनेतून २० महापालिकांना सुमारे तेराशे ई बस मंजूर झाल्याचं राज्यपाल म्हणाले. येत्या ५ वर्षात १० लाख सौर पंप पुरवण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यातले ३ लाख १२ हजार लावले गेल्याचं त्यांनी सभागृहाला सांगितलं. प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत १४ लाखांहून अधिक घरं बांधली गेली असून दुसऱ्या टप्प्यात १८ लाखापेक्षा अधिक घरं बांधण्याचं राज्य सरकारचं नियोजन आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचे राज्यात ९५ लाखांपेक्षा अधिक लाभार्थी आहेत. याशिवाय ८७ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड मिळालं आहे. चालू आर्थिक वर्षात ७४ हजार कोटी रुपयांहून अधिक पीक कर्ज वितरीत करण्याचं राज्य सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यापैकी ५५ हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरीत झाल्याची माहिती राज्यपालांनी दिली. किमान आधारभूत किंमतीवर यंदाच्या हंगामात ५६२ खरेदी केंद्रांवरुन ११ लाख मेट्रीक टनापेक्षा अधिक सोयाबीन, ७ लाख मेट्रीक टनापेक्षा अधिक तांदूळ आणि १७१ मेट्रीक टन धानाची खरेदी झाल्याचं ते म्हणाले.

लखपती दीदी योजनेअंतर्गत १७ लाख महिलांचं उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा अधिक झालं आहे. चालू आर्थिक वर्षात २६ लाख महिलांना याचा लाभ देण्याचं राज्य सरकारचं उद्दिष्ट आहे.

वैद्यकीय संशोधनाला चालना देण्यासाठी आरोग्य विद्यापीठाच्या अंतर्गत स्वतंत्र कंपनी स्थापन केली जाणार आहे. महाराष्ट्र पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधन संस्था तसंच इतर ७ शासकीय महाविद्यालयं याअंतर्गत काम करणार आहेत, अशी माहिती राज्यपालांनी दिली.

मिशन लक्ष्यवेध अंतर्गत ऑलिम्पिकसह आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये राज्यातल्या खेळाडूंची कामगिरी सुधारण्यासाठी राज्यस्तरावर ६ आणि विभाग स्तरावर ३७ क्रीडा उत्कृष्टता केंद्र सुरू होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><><>

राज्य सरकारनं अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या आज दोन्ही सभागृहात सादर केल्या. विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या मांडल्या. त्यात सर्वाधिक ३ हजार कोटी रुपयांहून अधिक मागण्या ग्रामविकास विभागाच्या आहे. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पावणे ४ हजार कोटी आणि मुख्यमंत्री बळीराजा वीज दर सवलत योजनेसाठी २ हजार कोटी रुपयांची तरतूद यात आहे. या मागण्यांवर ६ आणि ७ मार्च रोजी चर्चा आणि मतदान होणार आहे.

राज्यपालांच्या अभिभाषणावरचा आभार प्रस्ताव दोन्ही सभागृहात मांडण्यात आला.

विधानसभेत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तालिका सदस्य म्हणून योगेश सागर, बबनराव लोणीकर, दिलीप बनकर, सुनील राऊत, अमित झनक यांच्या नावांची घोषणा केली.

त्यानंतर माजी प्रधानमंत्री दिवंगत डॉ मनमोहन सिंग तसंच प्रदीप जाधव नाईक, मुकुंदराव मानकर, उपेंद्र शेंडे, तुकाराम बिरकड दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहून सभागृहाचं कामकाज तहकूब झालं.

विधान परिषदेत निरंजन डावखरे, चित्रा वाघ, कृपाल तुमाणे, अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि सुनील शिंदे यांची तालिका सदस्य म्हणून नेमणूक केल्याचं सभापती राम शिंदे यांनी जाहीर केलं.

कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयानं २ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. याप्रकरणी सरकारनं भूमिका मांडावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शोक प्रस्ताव मांडण्यापूर्वी केली. याप्रकरणी न्यायालयानं सुनावणी करुन निर्णय राखून ठेवला आहे. न्यायालयाचा निर्णय आल्यावर राज्यपाल किंवा विधानसभा निर्णय घेईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. त्यानंतर विधानपरिषदेत माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांना, तसंच घनश्याम दुबे, नारायण वैद्य, सुभाष चव्हाण या दिवंगत सदस्यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मंजूर झाल्यावर विधान परिषदेचं कामकाजही उद्यापर्यंत तहकूब झालं.

**<><><><><>**

वेव्ज समिट २०२५ अंतर्गत संगीत क्षेत्रासाठी बॅटल ऑफ बँड्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. प्रसार भारती आणि सारेगामा यांनी संयुक्तरित्या या स्पर्धेचं आयोजन केलं असून त्यात विविध बँड्सना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे.

**<><><><><>**

राज्यात गुन्हेगारी, बेरोजगारी असे अनेक प्रश्न असून सरकार केवळ घोषणाबाजीच करत आहे, अशी टीका काँग्रेस नेते नाना पटोले यांनी आज विधानभवनाच्या परिसरात वार्ताहरांशी बोलताना केली. राज्यपालांच्या आजच्या अभिभाषणात एकही नवा मुद्दा नव्हता, असं पटोले म्हणाले. राज्यात महिला सुरक्षित नाहीत, उद्योगधंदे राज्याबाहेर चालले आहेत, शहरीकरण मोठ्या प्रमाणात होत असून ग्रामीण भाग ओसाड पडत आहे, अशी टीका त्यांनी केली.

**होल्ड बाईट....**

**<><><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ७ मार्च रोजी सर्व लाभार्थ्यांना दिला जाईल. मार्च महिन्याचा हप्ता अर्थ खात्यातून निधी मिळाल्यानंतर देऊ, अशी माहिती महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी आज विधान भवन परिसरात दिली. २ कोटी ४० लाखांपेक्षा अधिक महिला या योजनेच्या लाभार्थी असल्याचं त्या म्हणाल्या.

**<><><><><><>**

आज जागतिक वन्यजीव संरक्षण दिवस आहे. पर्यावरण संतुलन, वन्यप्राण्याचं संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रयत्न करण्याच्या उद्देशानं जागरुकता निर्माण करण्यासाठी आज देशभरात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज गुजरातमध्ये सासन गीर इथं राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची सातवी बैठक झाली. या बैठकीत प्रधानमंत्र्यांनी जुनागढ इथं वन्यजीवांसाठीच्या राष्ट्रीय संदर्भ

केंद्राची पायाभरणी केली. तसंच, सोळावा आशियाई सिंहगणना अहवाल, तसंच मानव-वन्यजीव संघर्ष व्यवस्थापन कार्यक्रम 'सॅकोन'चं अनावरण केलं. तत्पूर्वी प्रधानमंत्र्यांनी गीर राष्ट्रीय उद्यानाची सफर केली आणि नंतर वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेतला.

**//<><><><><><> //**